जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार

०६.०७.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २३ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## थोडक्यात

### धुळ्यात एसटी बस अन ट्रेलरची धडक, ड्रायव्हर फरार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**धुळे** - राज्यात एकीकडे पावसाचा जोर वाढला असून मुंबई, पुण्यासह उपनगरात पावसाची धुव्वाधार बॅटिंग पाहायला मिळत आहे. त्यातच, शिंदखेडा तालुक्यातील चिमठाणे गावाजवळ धुळे-नंदुरबार मार्गावरील एसटी बस आणि मालवाहू ट्रेलर यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात बस चालक अनिल देवरे यांच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली असून बसमधील सुमारे ३० ते ४० प्रवाशांचे प्राण थोडक्यात बचावले. प्राथमिक माहितीनुसार धुळे-नंदुरबार एसटी बस धुळ्याकडून नंदुरबारच्या दिशेने जात असताना चिमठाणे गावाकडून येणाऱ्या मालवाहू ट्रेलरने बसला समोरून जोरदार धडक दिली.

# पावसाचा तडाखा वाढणार : 'समुद्रकिनारे, धबधब्यांपासून दूर राहा', मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे नागरिकांना आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राज्यातील सध्याची पावसाची परिस्थिती ही अभूतपूर्व असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.६) सांगितले. एका दिवसात राज्यात सुमारे ३५० झाडे कोसळली, तर वर्षभरात सरासरी ८०० झाडे कोसळतात, असे त्यांनी नमूद केले. मंगळवार दुपारनंतर वाऱ्याचा वेग ताशी ७० ते ९० किलोमीटरपर्यंत वाढण्याची शक्यता असून, पावसाचाही जोर वाढेल, असा इशाराही त्यांनी दिला.



**समुद्रकिनारे आणि धबधब्यांपासून दूर राहा**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी विशेषतः तरुणांना समुद्रकिनारे, धबधबे आणि पावसाळी पर्यटनस्थळांवर जाणे टाळण्याचे आवाहन केले. खराब हवामानामुळे कोणताही धोका पत्करू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

**विधिमंडळाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब**

मुसळधार पाऊस आणि हवामान विभागाच्या गंभीर इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर सदस्य, अधिकारी आणि नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी राज्य विधिमंडळाचे कामकाज सोमवारी दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

**आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज**

सरकार परिस्थिती हाताळण्यासाठी पूर्णपणे सज्ज असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यातील सर्व आपत्ती व्यवस्थापन पथके तैनात करण्यात आली असून, आवश्यक त्या ठिकाणी मदतकार्य सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

**मंगळवारी परिस्थितीचा पुन्हा आढावा**

मंगळवारी दुपारी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात येणार असून, प्रत्यक्ष परिस्थितीनुसार पुढील निर्णय आणि आवश्यक निर्देश दिले जातील, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले मानखुर्द दुर्घटनेवर मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया

मानखुर्द येथे चाळ कोसळून सहा जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेवर बोलताना, संबंधित बांधकाम बेकायदा असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. विरोधकांची सरकारकडे मागणी दरम्यान, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मदत आणि बचावकार्य प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व सदस्यांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

# 'रामरक्षा नव्हे, पक्षरक्षा सुरू'

## संजय राऊतांवर नवनाथ बन यांचा घणाघात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - भाजपाचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. 'रामरक्षा आंदोलन' हे प्रत्यक्षात पक्ष आणि राजकीय अस्तित्व वाचवण्याचा प्रयत्न असून, जनतेसमोर कितीही नाटकी भूमिका घेतली तरी सत्य लपवता येणार नाही, असा आरोप नवनाथ बन यांनी केला.

... म्हणून तुम्हाला रामरक्षा म्हणता येत नाही : नवनाथ बन म्हणाले की, रामरक्षा आंदोलन करणाऱ्या उद्धव ठाकरे यांना पुस्तक वाचूनही रामरक्षेचे श्लोक म्हणता आले नाहीत. तसेच संजय राऊत यांनाही रामरक्षा म्हणता आली नाही. 'प्रभू श्रीरामांचे विचार आणि हिंदुत्व स्वीकारले नसल्यामुळेच तुम्हाला रामरक्षा म्हणता येत नाही. पक्ष, आमदार आणि नगरसेवक वाचवण्यासाठी हे आंदोलन सुरू असले, तरी जनता सर्व पाहत आहे. तुमचा धूर्तपणा आणि अहंकार ओळखून राज्यातील जनता योग्य वेळी उत्तर देईल,' असा टोला त्यांनी लगावला. ठाकरे गटाने शहराची लूट केली : मुंबईतील विकासकामांवरूनही बन (छर्रीरपरींह इरप) यांनी विरोधकांवर निशाणा साधला. 'ठेकेदारी, कमिशनखोरी आणि वसुली हा उद्धव ठाकरे गटाचा व्यवसाय राहिला आहे. गेली २५ वर्षे मुंबई महापालिकेवर सत्ता गाजवूनही त्यांनी शहराची लूट केली. भाजपाला लोकसेवेचे धडे देण्याचा त्यांना नैतिक अधिकार नाही,' असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, 'महायुती सरकारला सत्तेत येऊन अवघे सहा महिने झाले आहेत. या काळात आम्ही विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न करत आहोत. काही त्रुटी आढळल्यास त्या तातडीने दुरुस्त करून पुढे जाण्याची आमची भूमिका आहे. आम्ही जनतेमध्ये राहून काम करणारे आहोत, घरात बसून राजकारण करणारे नाही.

# शें.घाटच्या 'त्या' ७ नगरसेवकांची आपत्रता वाचली

## नगराध्यक्षांसह सत्तारुढ गटाला जिल्हा दंडाधिकाऱ्याचा झटका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** - नगराध्यक्ष सुवर्णा हरिभाऊ वरखेडे व नगरपरिषदेतील गटनेते प्रशांत सावरकर यांनी विरोधी पक्षनेते संदीप खडसे यांच्यासह सहा नगरसेवकांना अपात्र ठरविण्यात यावे, अशी याचिका १५ मे २०२६ ला जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे दाखल केली होती.

संदीप खडसे हे विरोधी पक्षनेते असून त्यांच्या गटात कुरेशी जाकीयाबानो मो. साहेब, शेख नसीर शेख बशीर, राकेश दवंडे, इसेखार अहमद इक्बाल अहमद, सुनीता कृष्णराव उईके, विशाल सावरकर हे सदस्य आहेत.

या सात जणांसह मुख्याधिकारी यांच्याविरुद्ध याचिका दाखल करण्यात आली होती. नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या विरोधी पक्षाला नगरपरिषदेत स्वतंत्र दालन उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र ही मागणी मान्य करण्यात आली नाही व त्यांना स्वतंत्र दालन देण्यात आले नाही. अखेर विरोधी पक्षनेते संदीप खडसे यांनी नगरपरिषदेच्या आवारात तात्पुरते दालन उभारून कारभार सुरू केला. यावर नगराध्यक्ष व गटनेत्यांनी आक्षेप घेत विरोधी पक्षाने अतिक्रमण केल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात यावे, अशा आशयाची याचिका जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे दाखल केली होती.

जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे झालेल्या सुनावणीत दोन्ही बाजूने जोरदार युक्तिवाद करण्यात आला. यामध्ये नगरपरिषदेतील पदाधिकारी यांच्या बैठक व्यवस्थेबाबत २७ फेब्रुवारीला झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव पारित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

> शेंदूरजनाघाट नगरपरिषदेच्या विरोधी पक्षनेत्यांसह सहा नगरसेवकांना त्यांनी नगरपरिषदेच्या आवारात अतिक्रमण केल्याने अपात्र ठरविण्यात यावे, अशी नगराध्यक्षांसह सत्ताधारी नगरसेवकाने दाखल केलेली याचिका जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी खारीज केली आहे. त्यामुळे या सातही जणांचे नगरसेवक पद वाचले असून त्यांनी उभारलेले तात्पुरते विरोधी पक्षाचे दालन अनधिकृत संरचनात्मक बांधकाम असल्याचे सिद्ध होत नसल्याचा निर्वाळा दिला आहे.

त्याचप्रमाणे विरोधी पक्षनेते संदीप खडसे व सहा नगरसेवकांनी तात्पुरते उभारलेले विरोधी पक्षाचे दालन हे अनधिकृत संरचनात्मक बांधकाम असल्याचे सिद्ध झाले नाही. त्यामुळे नगराध्यक्ष व गटनेत्यांनी दाखल केलेली अपात्र ठरविण्यासंदर्भातील याचिका नामंजूर करण्यात येत असल्याचा निर्णय देण्यात आला. या निर्णयामुळे सत्ताधारी पक्षाने सात नगरसेवकांना अपात्र ठरविण्यासाठी केलेला प्रयत्न अपयशी झाला असून सातही जणांचे पद कायम राहिले आहे. विरोधी पक्षनेते व सहा नगरसेवकांची बाजू ॲड.किशोर शेळके यांनी मांडली. त्यांनी याचिकेवरील सुनावणीदरम्यान काही दाखले देत याचिका योग्य नसल्याचे सिद्ध करून दिले.

# वारकऱ्यांसाठी प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधा

## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची माहिती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** - वारकरी भाविकांना आरोग्यसुविधा तत्काळ मिळाव्यात यासाठी सुसज्ज रुग्णवाहिका, बाइक ॲम्बुलन्सचा वापर करण्यात येतो. यावर्षीपासून अत्यावश्यक रुग्णांकरिता नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी रविवारी दिली. आषाढी यात्रेसाठी पालखी सोहळ्यासोबत लाखो



वारकरी भाविक येत असतात. पालखी मार्गावर तसेच आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. 'वारकरी वारीसाठी घरातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा घरी पोहोचेपर्यंत आरोग्याच्या सर्व आवश्यक सुविधा पुरवण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. त्या नियोजनाप्रमाणे सर्व सेवा पुरवाव्यात. वारी कालावधीत भाविकांना डिजिटल आरोग्य सुविधा देण्यात येणार आहेत. 'आरोग्य संपन्न वारी' व 'वारी सहाय्य' या माध्यमातून पालखी मार्गावर वारकरी भाविकांना तत्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध होणार असून, यामध्ये प्रत्येक आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांच्यामार्फत माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे,' असेही आबिटकर यांनी सांगितले.

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. वारकऱ्यांना मिळणार या आरोग्य सुविधा पालखी मार्गावरील पाणी स्रोतांचे सर्वेक्षण व व निजतुकीकरण. निर्जंतुकीकरण. डेंग्यू, मलेरिया आदी कीटकजन्य आजारांचे सर्वेक्षण तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना. पालखी मार्गावरील हॉटेल, ढाबे व उपाहारगृहांतील कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी व उपचार. पालखी मार्गावरील खासगी रुग्णालयांमध्ये अत्यावश्यक सेवांसाठी १० टक्के खाटा राखीव. पालखी मार्गावर ४३ ठिकाणी सुसज्ज आयसीयू सुविधा.



# मलकापूर येथील सारंग बालपांडे याचे चार्टर्ड अकाऊंटंट परीक्षेत यश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – मलकापुर येथील सारंग बालपांडे याने जिद्द, चिकाटी, संयम आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर अशक्य वाटणारे ध्येयही गाठता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे सीए सारंग उषा राजेंद्र बालपांडे संघर्षमय आणि यशस्वी झाल्या निमित्त त्यांचा सन्मान करण्यात आला.



सारंग यांनी अनेक अपयशांचा सामना करत अखेर देशातील अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत यश मिळविल्याने त्यांच्या निवासस्थानी जानुन न.प.महिला बालकल्याण समिती सभापती प्रिया पाटील, नगरसेवक विजय चौधरी, शेख नासीर, संजय वंजारी, नेपाल पाटील यांनी शाल पुष्पगुच्छ देवुन सारंग उषा राजेंद्र बालपांडे त्यांच्या उषा बालपांडे याच्या उपस्थितीत सन्मान केला.

यावेळी त्यांनी सी.ए.परिक्षेत यश मिळताना जो संघर्षमय प्रवास यावेळी कथन केला. कठीण परिस्थितीतही त्यांनी आपले स्वप्न जिवंत ठेवले आणि जिद्दीने अभ्यास सुरु ठेवला. या काळात त्यांची आई उषा बालपांडे आणि बहीण गुंजन बालपांडे या त्यांच्या सर्वात मोठ्या आधारस्तंभ ठरल्या. दोघींनी कुटूंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत सारंग यांना मानसिक बळ दिले आणि प्रत्येक संकटात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यांच्या त्याग, प्रेम आणि विश्वासामुळेच सारंग यांना आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करता आले.

त्यांच्या आई उषा व बहीण गुंजन बालपांडे हा अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे, असे सीए सारंग यांची ही यशोगाथा प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी आहे. अपयश हा शेवट नसून तो यशाकडे नेणारा टप्पा असतो, जिद्द, सातत्य, संयम, त्याग, कठोर परिश्रम आणि कुटूंबाचा भक्कम पाठिंबा असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नसते, हा संदेश त्यांच्या यशातून मिळतो, असे सांगितले.

# बँक फसवणूक : सीबीआय चौकशी सुरू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – केंद्रीय अन्वेषण ब्युरोच्या मुंबईतील विशेष कृती दलाने एका खासगी कंपनी आणि तिच्या संचालकांविरुद्ध स्टेट बँक ऑफ इंडियाचे ९.५५ कोटी रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

सीबीआयने सांगितले की, ही फसवणूक २०१८ ते २०२० या कालावधीत झाली असून, आरोपींनी एकमेकांशी संगनमत करून खोटे दावे, फसवणूक आणि प्रलोभन दाखवून कर्ज सुविधा मिळवल्या. तसेच कर्ज मंजुरीच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करणारे व्यवहार करून बँकेच्या निधीचा अपहार केला. ही कंपनी पवईत असून ती राजस्थानमधील बिकानेर येथील भाड्याने घेतलेल्या प्लांटद्वारे भुईमूग, डाळी, तीळ, मेथी, मोहरी इत्यादी कृषी मालावर प्रक्रिया आणि घाऊक व्यापाराच्या व्यवसायात गुंतलेली होती. हा माल शेतकऱ्यांकडून कच्च्या स्वरूपात खरेदी केला जात असे आणि देशांतर्गत तसेच निर्यात विक्रीसाठी त्यावर आवश्यक प्रक्रिया केली जात असे.

## डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये

# प्राचार्य डॉ.रामदास फुलारी यांच्या वाढदिवशी वृक्षारोपण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामदास फुलारी यांचा ६० वा वाढदिवस वृक्षारोपण कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला.



याप्रसंगी प्राचार्य डॉ. रा.ना.फुलारी व कर्मचाऱ्यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या व जनता शिक्षण संकुलाच्या परिसरात वेगवेगळ्या प्रजातीचे वृक्ष लावण्यात आले. प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने अभिष्टचिंतन करण्यात येऊन त्यांना आनंदी व आरोग्यदायी जीवनाच्या भरभरुन शुभकामना देण्यात आल्या. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.तिलकचंद धोटे, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ.लुंबिनी गणवीर, सहायक कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रशांत चर्जन, महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## जनता इंग्लिश स्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाची उत्साहात सुरुवात

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे हसतमुखाने स्वागत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त जनता इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.



शाळेच्या परिसराची आकर्षक सजावट करण्यात आली होती. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे हसतमुखाने स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांना शिस्त, स्वच्छता, नियमित उपस्थिती आणि अभ्यासाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नवीन विद्यार्थ्यांची ओळख करून देत त्यांना शाळेच्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साहामुळे शाळेचा पहिला दिवस संस्मरणीय ठरला. आगामी शैक्षणिक वर्ष यशस्वी आणि आनंददायी जावो, अशा शुभेच्छा शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिल्या.

# ...तर काशी-मथुरा किती लुटतील? रामरक्षा आंदोलनात ठाकरे यांचा सवाल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – देशाभिमानी हिंदू आहोत. आम्ही हिंदू भोळे आणि भाबडे नक्कीच आहोत, पण मूर्ख नाही. आपल्या याच हिंदुत्वाचा



गैरफायदा घेऊन जर कोणी राम मंदिर लुटत असेल, 'आपण कट्टर, तर आता हिंदू त्यांना माफ करणार नाही,' असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी दिला. यावेळी त्यांनी भाजप, पंतप्रधान आणि अयोध्येतील महंतांवर सडकून टीका केली. रविवारी दादर येथील ऐतिहासिक हनुमान मंदिरात (पुरातन वटवृक्ष मंदिर) ठाकरे गटाच्या वतीने 'रामरक्षा आंदोलना'ची हाक देण्यात आली होती. त्यावेळी ठाकरे बोलत होते. या ठिकाणी रामरक्षा स्तोत्र आणि हनुमान चालिसाच्या पठणासह महाआरती करून या राज्यव्यापी आंदोलनाचा शंखनाद केला. भरपावसात शिवसैनिक या आंदोलनासाठी उपस्थित राहिले. या आंदोलनाचे नेतृत्व स्वतः माजी मुख्यमंत्री आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले. त्यांच्यासोबत युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, खासदार अरविंद पदाधिकारी उपस्थित होते. या सावंत यांच्यासह मुंबईभरातील आंदोलनात सहभागी होण्यासाठी शेकडो शिवसैनिक आणि काही साधू–महंतही आले होते. शेवटी उद्धवजींना आठवला राम : फडणवीसांचा पलटवार ठाकरे गटा गटाच्या या 'रामरक्षा आंदोलना'वर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सडकून टीका केली. ते म्हणाले, 'मला आनंद आहे की शेवटी उद्धव ठाकरे यांना प्रभू श्रीरामाची आठवण झाली आहे.

## न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे

# प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल वरुड येथे सत्र २०२६–२७ करताना नवीन प्रवेशित तसेच सर्व विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव अतिशय मोठ्या उत्साहात थाटामाटात साजरा करण्यात आला.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अश्विन पोच्छी तर प्रमुख अतिथी म्हणुन ज्येष्ठ शिक्षिका मीना मानकर, मेघाविनी बढे, किशोर मांडेकर, पालक प्रतिनिधी बलदेव उईके, घोरपडे, शालिनी निंभोरकर, सविता प्रजापती, योगिता इरपाची, अनिता धुर्वे, भोयर उपस्थित होत्या.

सर्वप्रथम सर्व मान्यवरांच्या हस्ते शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले.

याप्रसंगी शिक्षिका मेघाविनी बढे यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेतून मार्गदर्शनपर शुभेच्छा दिल्या तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्यामधील वेगवेगळ्या कला सादर केल्या जसे गीत गायन, नृत्य यासारखे कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यात आला. या ठिकाणी उपस्थित नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना पुस्तक, नवीन गणवेश व पुष्पगुच्छ देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याकरिता सांस्कृतिक कार्यक्रम गमतीदार खेळ ,चित्र प्रदर्शनी अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यात आले तसेच सर्व पालकांना अल्पोपहार व चहा देण्यात आला. शाळेचे मुख्य प्रवेशद्वार विविध फुलांनी व विविध रंगांच्या फुग्यांनी सजविण्यात आले होते. अध्यक्ष मुख्याध्यापक अश्विन पोच्छी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संचालन शिक्षिका शुभांगीनी हेडाऊ तर आभार शिक्षिका सविता ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित सर्व पालकांच्या हस्ते परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

## युथ ऑलिम्पिक व राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेसाठी वरुडचे खेळाडू सज्ज

# मान्यवरांकडून खेळाडूंना विजयाचा मंत्र व शुभेच्छा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – ड्रीम्स तायक्कांदो असोसिएशनच्या खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली मोहोर उमटवण्यासाठी आणखी एक मोठे पाऊल टाकले आहे.



तायक्कांदो सबज्युनिअर कॅडेट, राज्यस्तरीय स्पर्धा आणि दर चार वर्षांनी आयोजित होणाऱ्या अत्यंत प्रतिष्ठेच्या 'युथ ऑलिम्पिक' निवड चाचणी स्पर्धेसाठी वरुड येथील खेळाडूंचा संघ अहिल्यानगर (अहमदनगर) कडे रवाना झाला आहे.

या खेळाडूंचे मनोबल वाढवण्यासाठी आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी नुकतेच एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपस्थित राहून मान्यवरांनी खेळाडूंशी संवाद साधला आणि त्यांचा उत्साह द्विगुणीत केला. संघ मुख्य प्रशिक्षक कृष्णा मिश्रा यांच्या खंबीर आणि अनुभवी नेतृत्वात या महत्त्वाच्या स्पर्धेसाठी रवाना झाला आहे. कृष्णा मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी घेतलेले कठोर परिश्रम पाहता, या स्पर्धेत खेळाडू उत्कृष्ट कामगिरी करुन शहराचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास क्रीडा वतुर्ळातून व्यक्त होत आहे.

खेळाडूंचा उत्साह वाढवण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला ड्रीम्स तायक्कांदो असोसिएशनचे अध्यक्ष लोकेश अग्रवाल, उपाध्यक्ष शशी यावलकर आणि सचिव प्रा.किशोर तडस प्रामुख्याने उपस्थित होते. 'खेळाडूंनी मैदानावर कोणतीही भीती न बाळगता आपले सर्वोत्तम योगदान द्यावे. संपूर्ण वरूड शहर तुमच्या पाठीशी उभे आहे. तुम्ही नक्कीच विजयी होऊन परताल!' असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमामुळे खेळाडूंचा आत्मविश्वास कमालीचा वाढला आहे. ४ वर्षांतून एकदाच येणारी युथ ऑलिम्पिकची सुवर्णसंधी साधण्यासाठी आणि राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदकावर नाव कोरण्यासाठी खेळाडू पूर्णपणे सज्ज झाले आहेत. अहिल्यानगर येथे होणाऱ्या या स्पर्धेकडे आता संपुर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून सर्व स्तरांतून या चमुवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# संपादकीय

**प्रयत्न केल्याशिवाय नशिबात काहीच मिळत नाही, कर्म हीच माणसाची खरी ओळख असते.**

## अधिवेशन की औपचारिकता? लोकशाहीच्या आरशातील बदलते चित्र

राज्याच्या विधिमंडळाचे अधिवेशन म्हणजे लोकशाहीचा सर्वात महत्त्वाचा उत्सव मानला जातो. जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे, सरकारच्या निर्णयांची चिकित्सा करण्याचे, धोरणांवर सखोल चर्चा घडवून आणण्याचे आणि सत्ताधाऱ्यांना उत्तरदायी बनविण्याचे हे सर्वोच्च व्यासपीठ आहे. एकेकाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच सरकारमध्ये अस्वस्थता निर्माण होत असे. विरोधी पक्षाचे नेते विविध विषयांवर अभ्यास करून सरकारला घेरण्यासाठी सज्ज असत. त्यामुळे प्रत्येक मंत्री, प्रत्येक विभाग आणि संपूर्ण प्रशासन सतर्क राहत असे. पण आज चित्र पूर्णपणे बदलले आहे. यावेळचे अधिवेशन पाहता, ते केवळ घटनात्मक औपचारिकता पूर्ण करण्यापुरते मर्यादित राहिल्याची भावना अनेकांच्या मनात निर्माण झाली आहे. लोकशाहीत विरोधी पक्ष हा सरकारचा शत्रू नसतो, तर तो लोकशाहीचा आवश्यक आधारस्तंभ असतो. सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर प्रश्न विचारणे, जनतेच्या समस्या सभागृहात मांडणे आणि सरकारच्या चुका निदर्शनास आणून देणे हे विरोधी पक्षाचे कर्तव्य आहे. पूर्वी विरोधी पक्षाची संख्या कमी असली तरी त्यांचा अभ्यास, तयारी आणि आक्रमक भूमिका यामुळे सरकारला अनेकदा कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागायचे. अनेक घोटाळे उघडकीस आले, अनेक जनहिताचे निर्णय बदलावे लागले आणि प्रशासन अधिक जबाबदार बनले. त्यामुळे अधिवेशनाचा प्रत्येक दिवस महत्त्वाचा मानला जात असे. आज मात्र अधिवेशनातील चर्चेची पातळी घसरताना दिसत आहे. जनतेच्या मूलभूत प्रश्नांपेक्षा राजकीय आरोप-प्रत्यारोप, घोषणाबाजी आणि माध्यमांसाठी केले जाणारे राजकारण यालाच अधिक महत्त्व मिळताना दिसते. शेतकरी, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, महागाई, पाणीटंचाई, उद्योग, पर्यावरण अशा गंभीर विषयांवर सखोल चर्चा अपेक्षित असताना अनेकदा सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण होते. परिणामी, जनतेच्या अपेक्षा अपूर्ण राहतात आणि अधिवेशनाचे महत्त्व कमी होत जाते. विरोधी पक्षाची ताकद केवळ संख्येवर अवलंबून नसते, तर त्यांच्या मुद्द्यांच्या ताकदीवर अवलंबून असते. इतिहासात अनेक वेळा कमी संख्याबळ असलेल्या विरोधी पक्षांनी सरकारला कठोर प्रश्न विचारून अडचणीत आणले आहे. अभ्यासपूर्ण मांडणी, पुराव्यांसह केलेले आरोप आणि जनतेच्या प्रश्नांशी असलेली बांधिलकी यामुळे त्यांचे म्हणणे प्रभावी ठरत असे. मात्र सध्याच्या राजकारणात अनेकदा विरोधासाठी विरोध किंवा प्रसिद्धीसाठी आंदोलन अशी परिस्थिती दिसून येते. त्यामुळे विरोधी पक्षाची

# नाझींच्या मार्गानेच सुरू इस्रायलची वाटचाल

नरसंहाराच्या, अत्याचाराच्या वेदना काय असतात याचा अनुभव ज्यू लोकांना आहे. त्यांनी भोगलेल्या यातनांबद्दल जग नेहमीच सहानुभूती दाखवते. यातना भोगलेले लोकच जेव्हा पॅलेस्टिनी जनतेवर अत्याचार करून, मुक्तपणे नरसंहार करतात तेव्हा ते भूतकाळातून शिकले नाहीत हेच स्पष्ट होते.



'ऑक्टोबर २०२५ च्या युद्धबंदीपासून पॅलेस्टिनी मुला-मुलींशी लिंगभेदात्मक वर्तन केल्याचे, लैंगिक अत्याचार केल्याचे, त्यांना अमानवी आणि अपमानकारक वागणूक दिल्याचे, जाणीवपूर्वक, लक्ष्य करून त्यांच्या हत्या केल्याचे, तसेच मुलांसाठी अत्यावश्यक असलेल्या अनाथालये, आरोग्य सेवा आणि शैक्षणिक पायाभूत सेवासुविधांना लक्ष्य करून दिनांक ७ ऑक्टोबर २०२३ ते ७ ऑक्टोबर २०२५ दरम्यान मोठ्या प्रमाणात मुलांची पद्धतशीरपणे हत्या केल्याचे, त्यांना जखमी केल्याचे निर्विवाद पुरावे आयोगाला मिळाले आहेत. २०,००० मुले मारली गेल्याचे आणि ४४,००० पेक्षा अधिक मुले जखमी झाल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. 'व्याप्त पॅलेस्टिनी प्रदेशात' (ओपीटी) हत्या झालेल्यांमध्ये ३० टक्के मुले आहेत आणि मुलांना मारणे तसेच जखमी करणे हे सातत्याने चालू आहे.' संयुक्त राष्ट्रांच्या (युनो) मानवाधिकार परिषदेतील 'स्वतंत्र आंतरराष्ट्रीय चौकशी आयोगाचे' अध्यक्ष न्या. एस. मुरलीधर यांची वरील धक्कादायक माहिती देणारी व्हिडीओ क्लिप जगभरात व्हायरल झाली आहे.

या दोन वर्षांच्या काळात 'व्याप्त पॅलेस्टिनी प्रदेशात' नरसंहार करणारे आहेत इस्रायलच्या सैन्यदलांचे (आयडीएफ) सैनिक. या नरसंहाराच्या चौकशीसाठी युनोने नेमलेल्या स्वतंत्र चौकशी आयोगाच्या दि. १८ जून २०२६ च्या अहवालावर एक दृष्टिक्षेप टाकल्यास एकेकाळी जगाची प्रचंड सहानुभूती लाभलेल्या ज्यू लोकांच्या देशाचा आणि त्यांच्या सेनेचा अत्यंत भेसूर चेहरा आपल्याला दिसून येईल.

ज्यू लोकांचा इस्रायल हा स्वतंत्र देश अस्तित्वात आला तेव्हापासूनच पॅलेस्टिनी आणि इस्रायली यांच्यात कायम हिंसक चकमकी होत आल्या आहेत. परंतु ७ ऑक्टोबर २०२३ नंतर ६७,००० पॅलेस्टिनी लोकांचे बळी घेणारा नरसंहार कोणाही संवेदनशील व्यक्तीस अस्वस्थ करणारा आहे. हा नरसंहार सुरू होण्यास कारणीभूत झाले गाझा पट्टीतून हमास या दहशतवादी संघटनेने नियोजनबद्धपणे जमीन, समुद्र आणि हवाई मार्गाने इस्रायलवर दि. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी केलेले तीव्र हल्ले. त्यांनी इस्रायली सैनिकांच्या संरक्षक भिंती पार करून सामान्य लोकांवर, उत्सवाचा आनंद घेणाऱ्या लोकांवर भीषण गोळीबार केला. इस्रायलवर हजारो रॉकेट्स सोडली. मोटरबोटींमधून येऊन हल्ले चढवले. यात ११४० इस्रायली नागरिकांचा बळी गेला, तर सुमारे २५० लोकांना पळवून नेऊन हमासने ओलीस ठेवले. हा हल्ला इस्रायलला अनपेक्षित होता आणि हमासने इस्रायल बेसावध असताना आपला डाव साधला होता. इस्रायल हे सार्वभौम राष्ट्र असल्याने त्यांनी हल्ल्याला चोख उत्तर देणे, हमासला धडा शिकवणे क्रमप्राप्त होते. म्हणून गाझा पट्टीवर प्रत्युत्तरादाखल केलेल्या हल्ल्याबद्दल इस्रायलला दोष देता येणार नाही. परंतु, हमासला धडा शिकवणे मागे पडून गाझा पट्टीत नरसंहार करून तिथले जनजीवन, मालमत्ता नष्ट करण्याकडे झालेली इस्रायलची वाटचाल चिंताजनक आहे.

हमास आणि इस्रायल यांच्यात ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या युद्धविरामानंतर देखील या नरसंहारात खंड पडलेला नाही. या काळात त्यांनी बळी घेतलेल्या पॅलेस्टिनी लोकांची संख्या ६७,००० जरी असली तरी बॉम्ब/क्षेपणास्त्र हल्ले करून उद्ध्वस्त केलेल्या इमारतींच्या ढिगाऱ्यांखाली दबून मेलेल्या हजारो लोकांची कसलीही मोजदाद नाही. मृतांमध्ये २०,००० लहान मुलांचा समावेश आहे. १,६९,००० लोक जखमी झालेले आहेत. युनिसेफच्या अंदाजानुसार तीन ते चार हजार मुलांनी आपले एक किंवा अधिक अवयव गमावले आहेत. १०,८०० पेक्षा अधिक पॅलेस्टिनी लोक इस्रायली तुरुंगात खितपत पडले आहेत, ज्यात ४५० मुले आणि ८७ स्त्रियांचा समावेश आहे. माध्यमे आणि पत्रकारितेतील ३०० लोक मृत्युमुखी पडले आहेत.

या नरसंहारातील आयडीएफने केलेल्या क्रूर अत्याचारांची वर्णने अंगावर काटा आणणारी आहेत. त्यातील काही प्रातिनिधिक उदाहरणे पाहूया. सहाय्यता छावणीतील एका तंबूमध्ये एका दहा दिवसांच्या बाळाला आई दूध पाजत असताना एका पॉडकोप्टरमधून (लहान ड्रोनचा एक प्रकार) त्या बाळाच्या डोक्यात दिवसाढवळ्या गोळी घातली गेली. १२ एप्रिल २०२४ रोजी घडलेल्या या घटनेत ते बाळ वाचले असले तरी त्याला आता सतत झटके येऊ लागले आहेत.

दि. २४ जानेवारी २०२४ रोजी इस्रायली सैनिकांनी स्थानिक लोकांनी परिसरातून निघून जावे अशी घोषणा केली. त्यानुसार एका कुटुंबातील १६ वर्षांचा मुलगा हातात पांढरे निशाण घेऊन बाहेर पडत असताना त्याला गोळ्या घालण्यात आल्या. त्याला वाचवायला त्याचा २० वर्षांचा भाऊ धावला, तेव्हा त्याला तिथल्या तिथे गोळ्या घालून संपवले. मुलांच्या आईवडिलांनी मुलांचे प्रेत ताब्यात घेण्यासाठी थोडीशी हालचाल केली तरी त्यांच्यावर गोळीबार केला जात होता. दिनांक २९ जानेवारी २०२४ रोजी एकाच कुटुंबातील सात जणांचा बळी आयडीएफच्या सैनिकांनी घेतला होता. आयडीएफचे सैनिक वेगवेगळ्या दिवशी निष्पाप युवकांच्या शरीराच्या वेगवेगळ्या भागावर ठरवून गोळ्या घालण्याचा गेम खेळत होते आणि नेमबाजीचा सराव करीत होते, असेही आयोगाच्या निदर्शनास आले आहे. एका दिवशी एक अवयव ठरवायचा आणि दिसणाऱ्या मुलांच्या त्याच अवयवावर सैनिकांनी गोळ्या घालायच्या, दुसऱ्या दिवशी दुसरा अवयव... असा एक पॅटर्न आयोगाच्या निदर्शनास आला आहे. हे अत्यंत अमानवी आणि विकृत आहे. मुलींवर अत्यंत विकृत पद्धतीने अत्याचार केले गेले.

गाझा पट्टीतील ९२ टक्के निवासी आणि ८८ टक्के व्यापारी इमारती नष्ट झालेल्या आहेत. शाळा, महाविद्यालयांशी संबंधित २,३०० पेक्षा अधिक इमारती नष्ट झालेल्या आहेत. ८६ टक्के पाणी आणि सांडपाणी व्यवस्था नष्ट झालेली आहे. १२५ इस्पितळे आणि दवाखाने क्षतिग्रस्त झालेले आहेत. १,७२२ आरोग्य आणि सहाय्यताकर्मी मृत झालेले आहेत. या उद्ध्वस्त नगरीत राहणाऱ्या लोकांपर्यंत मदत पोहोचू दिली जात नाही. त्यामुळे तिथे मोठ्या प्रमाणात अन्नटंचाई आहे. उपासमारीमुळे १५४ मुलांसह ४५९ लोक मृत्युमुखी पडले आहेत. काही ठिकाणी रेशनिंग पद्धतीने अपुरा अन्नपुरवठा केला जात असला तरी असे अन्न मिळवण्यासाठी धडपड करताना २,६०० लोक मारले गेले आहेत, तर १९,००० लोक जखमी झाले आहेत. युनो समर्थित एका संघटनेच्या अंदाजानुसार सप्टेंबर २०२६ अखेपर्यंत गाझा पट्टीतील जवळपास एक तृतीयांश (६,४१,०००) लोकसंख्येला अन्नटंचाईच्या भीषण आपत्तीला सामोरे जावे लागणार आहे.

क्रूरकर्मा हिटलरच्या नेतृत्वाखाली नाझींनी ज्यू लोकांचा अनन्वित छळ केला. गॅस चेंबर्समध्ये घालून आणि गोळीबार करून ६० लाख ज्यूंचा नरसंहार केला. एवढी दिव्ये पार करून ज्यू लोकांनी १९४८ साली आपले इस्रायल हे स्वतंत्र राष्ट्र मिळवले. नरसंहाराच्या आणि अत्याचाराच्या वेदना काय असतात याचा भयंकर अनुभव ज्यू लोकांना आहे. त्यांनी भोगलेल्या यातनांबद्दल जग त्यांच्याबाबतीत नेहमीच सहानुभूती दाखवते. असे भोग अन्य कोणत्याही समुदायाच्या वाट्याला येऊ नयेत अशीच अपेक्षा असते. परंतु हे सर्व भोगलेले लोकच जेव्हा आपल्या आयडीएफच्या माध्यमातून नाझींना लाजवतील असे अत्याचार पॅलेस्टिनी जनतेवर, मुलांवर करून, त्यांचा मुक्तपणे नरसंहार करतात तेव्हा नाझींनी केलेल्या त्यांच्या नरसंहारातून ते काहीही शिकले नसून उलट त्यांच्याच मार्गाने जात आहेत, असे खेदाने म्हणावे लागते.

---

# परीक्षा की थट्टा? पेपरफुटीच्या गर्तेत अडकलेली शिक्षण व्यवस्था!

व्यक्ती, समाज आणि राष्ट्र या त्रिसूत्रीला समृद्ध व सुदृढ करणारी एक अत्यंत पवित्र व्यवस्था म्हणून आपण शिक्षणाकडे मोठ्या आशेने पाहतो. आजच्या आधुनिक शिक्षणप्रणालीत विद्यार्थी हाच या संपूर्ण व्यवस्थेचा केंद्रबिंदू मानला गेला आहे. ज्या तरुण पिढीच्या खांद्यांवर कुटुंबाचे, समाजाचे आणि पर्यायाने संपूर्ण देशाचे भविष्य अवलंबून असते; दुर्दैवाने आज त्याच विद्यार्थ्यांचे भवितव्य पेपरफुटीच्या प्राणघातक विळख्यात सापडले आहे.




वास्तविक पाहता, परीक्षा हे विद्यार्थ्यांच्या कष्टाचे, बुद्धिमत्तेचे आणि प्रामाणिकपणाचे मूल्यमापन करणारे एक निष्पक्ष साधन असते. परंतु, या परीक्षा राबविणारी यंत्रणाच जेव्हा आपली नैतिक जबाबदारी आणि प्रामाणिकता हरवून बसते, तेव्हा विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचे नव्हे, तर पैशांचे मूल्यमापन सुरु होते. हल्ली देशापाठोपाठ राज्यातही पेपरफुटीच्या लागोपाठ समोर येणाऱ्या प्रकरणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैफल्य आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सातत्याने होणाऱ्या या गैरप्रकारांमुळे संपूर्ण परीक्षा पद्धतीची विश्वासार्हता आता धोक्यात आली असून शिक्षण व्यवस्थेकडून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी थट्टा सुरु आहे की काय? असा संतप्त प्रश्न आज उपस्थित होतो. समृद्ध इतिहास, अद्वितीय संस्कृती, शिक्षण, अध्यात्म अशा वारशामुळे जगभरात ओळखल्या जाणाऱ्या भारत देशाच्या शिक्षण व्यवस्थेत जर पेपरफुटीचे विष कालवले जात असेल, तर यापेक्षा मोठे दुर्दैव नाही. ही केवळ एका परीक्षेची नव्हे, तर देशाच्या उज्ज्वल भविष्याची गळचेपी आहे. देशात नीट आणि राज्यात शिक्षक पात्रता परीक्षा या महत्वपूर्ण परीक्षांमध्ये घोटाळे होणे म्हणजे सरकारपेक्षाही पेपरफुटीच्या यंत्रणा अधिक प्रभावी असल्याचे स्पष्ट दिसून येते. केवळ नीट किंवा टीईटी नव्हे, तर अशा अनेक परीक्षांमध्ये सातत्याने होणारे पेपरफुटीचे प्रकार आता चिंतेचा विषय बनले आहेत. या परीक्षांमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या आणि पेपर फोडणाऱ्या शिक्षण माफियांच्या पाठीवर प्रशासनातील कोणत्या महाभागांचा वरदहस्त आहे, याचा पर्दाफाश करणे आता अत्यंत गरजेचे झाले आहे. शासकीय यंत्रणेच्या अधिकारातील परीक्षा पद्धतीला जर परराज्यातील घुसखोर येऊन गालबोट लावत असतील, तर सरकारच्या नियंत्रण अधिकाऱ्यांची डोळेझाक आणि निष्क्रियता नेमकी कशासाठी? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

एका पेपरफुटीमुळे त्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी होते. कित्येक महिने किंवा वर्षानुवर्ष दिवस - रात्र एक करुन परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची मेहनत जेव्हा अशा गैरप्रकारांमुळे एका झटक्यात वाया जाते, तेव्हा त्यांच्या मनात तीव्र निराशेची भावना निर्माण होते. या मानसिक धक्क्यामुळे अनेक विद्यार्थी नैराश्याच्या गर्तेत ढकलले जातात आणि काही विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण इतके होते की त्यांच्या मनात आत्महत्येसारखे टोकाचे विचारही येऊ लागतात. सतत बदलणारे परीक्षेचे वेळापत्रक आणि फेरपरीक्षेची टांगती तलवार यामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड मानसिकता आणि अस्वस्थता वाढलेली दिसून येते. या संपूर्ण चक्रात ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघर्ष तर काळीज पिळवटून टाकणारा आहे. शेतकरी, कष्टकऱ्यांची ही मुले शहरात राहण्यासाठी भाड्याची खोली, मेसचा खर्च भागवण्यासाठी प्रचंड आर्थिक ओढाताण सहन करतात. कित्येक विद्यार्थी तर दिवसा पडेल ते काम करुन, रात्रीचा दिवस करत अभ्यास करतात. त्यांच्या या जिद्दीला जेव्हा पेपरफुटीच्या भ्रष्टाचाराचा डंख लागतो, तेव्हा केवळ एका विद्यार्थ्याचे नाही, तर एका संपूर्ण गरीब कुटुंबाचे भवितव्य अंधारात ढकलले जाते. आज देशात आणि राज्यात ज्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरु आहे, ते अत्यंत वेदनादायी आहे. मात्र, जर यंत्रणेतील नैतिकता अशीच संपत राहिली आणि शिक्षण व्यवस्थेने विद्यार्थ्यांप्रती असलेली आपली संवेदनशीलता गमावली, तर भविष्यात 'विद्यार्थी आत्महत्यांचे' असेच भयंकर सत्र सुरू व्हायला वेळ लागणार नाही. ज्या भाऊसाहेबांनी शिक्षणाच्या बळावर अख्खा महाराष्ट्र समृद्ध केला आणि गोरगरीब, वंचित विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची गंगा घराघरांपर्यंत पोहोचवली; आज त्याच भाऊसाहेबांचे विचार आणि नैतिक मूल्ये आम्ही विसरलो आहोत का ? परीक्षा पद्धतीचा झालेला हा बाजार पाहिल्यावर आज हा विदारक सवाल उपस्थित होत आहे.

दरवेळी पेपर फुटतो, प्रसारमाध्यमांवर त्याचे जाहीर प्रदर्शन होते आणि त्यानंतर शासनातील जबाबदार अधिकारी हा प्रकार अत्यंत गंभीर आहे असे ठरवून दिलेले पोकळ वक्तव्य करतात. काही दिवसांनी हा विषय विधिमंडळात गाजतो, सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चिखलफेक होते, ताशेरे ओढले जातात. परंतु, केवळ चर्चा, आरोप-प्रत्यारोप आणि वक्तव्यांच्या पलीकडे जाऊन यावर ठोस, कायमस्वरूपी प्रतिबंधात्मक उपाययोजना कधीच होत नाहीत. दुर्दैवाने, तरुणांच्या भविष्याचा असा खेळ खंडोबा पाहणारा हा आजचा आमचा महाराष्ट्र आहे. अंगावर पांढरेशुभ्र कपडे चढवल्याने कोणाचे विचार स्वच्छ होत नाहीत, त्यासाठी काळजात विद्यार्थ्यांच्या भविष्याप्रती खरी सहानुभूती आणि संवेदनशीलता असावी लागते. राज्याचे आणि पर्यायाने देशाचे भविष्य सुरक्षित करायचे असेल, तर विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या गैरप्रकारांवर कायमस्वरुपी प्रतिबंध लावणे गरजेचे आहे. परीक्षा कोणतीही असो, ती अत्यंत पारदर्शक आणि विश्वासार्ह वातावरणातच घेतली गेली पाहिजे. शासनाने नेहमीच विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन त्यांना योग्य न्याय दिला, तरच आपला महाराष्ट्र खऱ्या अर्थाने अधिक समृद्ध आणि सुजाण होईल.



**प्रा.वैभव जिचकार**
आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
मो.९१३०४५१९४९

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

वसंतदास महाराज सहकारी पतसंस्थेच्या वरुड शाखेत

# सहकार सप्ताह उत्साहात साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – येथुन जवळच असलेल्या लोणीच्या वसंतदास महाराज सहकारी पतसंस्था येथे सहकार सप्ताह निमित्त संस्थेची यशोगाथा कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या वरुड शाखा परिसरामध्ये करण्यात आलेले होते.

कार्यक्रमाचे उदघाटक सहकारी संस्था सहाय्यक निबंधक डॉ.आशिष चर्जन तर पतसंस्थेचे अध्यक्ष सुभाष उर्फ गोपाल मालपे होते. प्रमुख अतिथी म्हणुन सहकार अधिकारी अमित नालट, सहकार अधिकारी सुनिल पंडागळे व संचालक मंडळ उपस्थित होते. यावेळी बोलतांना आशिष चर्जन भारतात सहकार चळवळ अधिक बळकट व गतिमान करण्यासाठी सहा जुलै २०२१ रोजी केंद्र सरकारने देशात पहिल्यांदा स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आल्याचे सांगितले. संस्थाध्यक्ष गोपाल मालपे यांनी संस्थेची यशोगाथा सांगितली. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रवीण मेंढे तर आभार व्यवस्थापक टाकरखेडे यांनी मानले. कार्यक्रमाला संस्थेचे सभासद मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्था कर्मचारी वर्ग, संचालक मंडळ परिश्रम घेतले.



**वरुड :** शहरातील प्रसिध्द स्त्रि रोग व प्रसुती तज्ञ डॉ.चेतन कोल्हटकर यांना वाढदिवस निमित्ताने शाल व पुस्तक देवुन शुभेच्छा देतांना राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे तथा उपस्थित वैद्यकीय तज्ञ डॉ.प्रियाली कोल्हटकर व इतर.

# सहकारी सदस्यांना रेकॉर्ड नाकारल्याबद्दल अपात्रता कायम : उच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – बॉम्बे उच्च न्यायालयाने एका सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या तीन पदाधिकाऱ्यांची अपात्रता कायम ठेवली आहे. उपनिबंधकांच्या वारंवार आलेल्या निर्देशांनंतरही त्यांनी एका सह-समिती सदस्याने मागितलेले रेकॉर्ड जाणीवपूर्वक दिले नाहीत, असा निकाल न्यायालयाने दिला आहे.



वैशाली नगर महालक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे पदाधिकारी शशिकांत रामणे आणि इतर दोघांनी उपनिबंधक, सहनिबंधक आणि सहकार मंत्र्यांनी दिलेल्या आदेशांना आव्हान देणारी याचिका दाखल केली होती.

न्यायमूर्ती संदीप मारणे यांनी ही याचिका फेटाळून लावली. 'महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमा' अंतर्गत समितीच्या बैठकींचे इतिवृत्त आणि इतर कागदपत्रांच्या प्रती देण्यास कसूर केल्याबद्दल प्राधिकरणांनी त्यांना जबाबदार धरले होते आणि पाच वर्षांसाठी समितीची निवडणूक लढवण्यास बंदी घातली होती. समितीचे सदस्य संदेश वायंगणकर यांनी एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ दरम्यान झालेल्या १३ व्यवस्थापक समितीच्या बैठकांच्या इतिवृत्ताच्या प्रती आणि संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीचे (एजीएम) व्हिडिओ रेकॉर्डिंग मागितल्याने हा वाद निर्माण झाला होता.

धि्रतीस किडझी आणि धि्रती ग्लोबल स्कूलच्या

# विद्यार्थ्यांचे ऑलिम्पियाडमध्ये राज्यस्तरीय यश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – धि्रतीस किडझी आणि धि्रती ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळा व परिसराचा गौरव वाढविला आहे.

या स्पर्धेत कृष्णा अमोल गणोरकर, सानवी भूषण जयस्वाल आणि ऐश्वर्य सुनील वाघ यांनी स्टेट टॉपर होण्याचा मान मिळवला. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल शाळेत आनंदाचे वातावरण असून पालकांनीही त्यांचे कौतुक केले. या यशामागे विद्यार्थ्यांची जिद्द, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व परिश्रम मोलाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण यशाबद्दल शाळेच्या व्यवस्थापनाने, मुख्याध्यापकांनी व सर्व शिक्षकांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. धि्रतीस किडझी आणि धि्रती ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच कटिबद्ध असून अशा यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे.

जाहीर नोटीस

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

क्र.प्रस्तु-१/कावी-३२१/२५-२६ दि.२९/०६/२०२६

### जाहीरनामा :-

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **अब्दुल वकील अब्दुल सलीम शेख, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे- अब्दुल वकील अब्दुल सलीम शेख, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१०/०९/१९९०** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. आज रोजी **२९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार
वरुड**

# केंद्र सरकारची मेटा कंपनीला नोटीस : इन्स्टाग्राम जाहिरातींमध्ये बाल लैंगिक शोषण कंटेंटप्रकरणी कारवाई

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** – इन्स्टाग्रामवरील सशुल्क जाहिरातींमध्ये बाल लैंगिक शोषण आणि अत्याचार सामग्री आढळल्याबद्दल सरकारने सोशल मीडिया क्षेत्रातील दिग्गज कंपनी 'मेटा'ला नोटीस बजावली आहे, अशी माहिती सूत्रांनी रविवारी दिली. सरकारने ही नोटीस शनिवारी संध्याकाळी पाठवल्याचे समजते. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने इन्स्टाग्रामला बाल लैंगिक शोषणाचा प्रसार करणाऱ्या किंवा अशा सामग्रीपर्यंत पोहोच सुलभ करणाऱ्या सर्व जाहिराती आणि मजकूर त्वरित बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

सात दिवसांत मागवले सविस्तर स्पष्टीकरण माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी इन्स्टाग्रामवरील या वादग्रस्त जाहिरातींनंतर मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांना मेटाच्या प्रतिनिधींना समन्स बजावण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर मंत्रालयाने नोटीस पाठवून या प्रकरणी ७दिवसांच्या आत सविस्तर स्पष्टीकरण आणि केलेल्या कारवाईची माहिती मागवली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, व्हॉट्सॲपने या फीचरचे रोलआऊट तूर्तास पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. मेटाच्या एका पथकाने या संदर्भात आयटी मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली असून, ३ दिवसांच्या दिलेल्या मुदतीत कंपनी आपले अंतिम उत्तर सादर करणार आहे. सरकारची भूमिका जाहिरातींची मंजुरी कशी मिळाली? अशा प्रकारच्या जाहिरातींना प्लॅटफॉर्मवर मंजुरीच कशी मिळाली? आरोप समोर आल्यानंतर मेटाने काय पावले उचलली? आणि भविष्यात असे घडू नये म्हणून काय सुरक्षा उपाय केले जातील? यावर सरकार उत्तर मागणार आहे.

नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.२ येथे

# विद्यार्थ्यांसाठी शाळा प्रवेश-ोत्सव दिन उत्साहात साजरा



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.२ येथे पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांसाठी शाळा प्रवेश-ोत्सव दिन तसेच पुस्तक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न.प.उपाध्यक्ष सुनिता वंजारी तर प्रमुख अतिथी म्हणुन नगराध्यक्षा सुवर्णा वरखडे, पाणीपुरवठा सभापती प्रिया पाटील, नगरसेविका स्नेहल वघाळे, नगरसेवक विजय चौधरी, संदीप खडसे, शेख नासिर, राकेश दवंडे, पवन मोघे व सर्व नगरसेवक उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष देवानंद राठोड, सर्व सदस्य, शिक्षक विजयकुमार इंगळे, हेमंत धानुरकार, विजय राऊत, नितीन गायकवाड, रिना पुरी, कल्याणी बिडकर, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि सर्व विद्यार्थी मित्रांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या शाळा प्रवेश-ोत्सवाच्या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते मुलांना पाठ्यपुस्तक व लाडू वितरित करण्यात आले.

उपविभागीय कृषी अधिकारी मोर्शी यांच्या मार्गदर्शनाखाली

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० अंतर्गत वृक्षारोपण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**हिवरखेड** – उपविभागीय कृषी अधिकारी मोर्शी यांच्या मार्गदर्शनाखाली नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० अंतर्गत वृक्षारोपण ०३ जुलै रोजी मोर्शी तालुक्यातील लेहेगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमावेळी उपसरपंच रेखा वासनिक, सहाय्यक कृषी अधिकारी श्रीराम फुलकर, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन समन्वयक योगेश बारबूध्ये, तंत्रज्ञान समन्वयक श्रीकृष्ण गोफने, समूह सहाय्यक दिपाली उगले, रोजगारसेवक सचिन कळमकर व गावकरी उपस्थित होते. यावेळी योगेश बारबुध्ये यांनी शेततळे, विहीर पुनर्भरण, मूलस्थानी जलसंधारण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. पावसाचे पाणी साठवण, भूजल पातळी वाढवणे आणि शेतीसाठी शाश्वत पाणी उपलब्धता निर्माण करण्यासाठी जास्तीत जास्त शेततळे उभारण्याचे तसेच शेताचे पाणी अडवून जमिनीत मुरविने, पिकांना सरी वरंबा पद्धत करणे, अतिरिक्त पाण्याचा निचरा करणे सेंद्रिय खताचा वापर करणे तसेच श्रीकृष्ण गोफने यांनी हवामान अनुकूल तंत्रज्ञान याबद्दल माहिती दिली व ते अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले.

मूलस्थानी जलसंधारण, वृक्षारोपण नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन मूलस्थानी गावाच्या विकासासाठी ग्रामस्थांनी दिलेला उत्स्फूर्त सहभाग प्रेरणादायी ठरला.

**पाणी अडवा – पाणी जिरवा,
झाडे लावा – झाडे जगवा
गाव घडवा!**

न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे

# माता-पालक-शिक्षक सभा उत्साहात संपन्न



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम माता-पालक-शिक्षक सभा नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

सभेला पालकांचा मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पालकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह सर्वांगीण विकासासाठी शाळेच्या उपक्रमांना सकारात्मक प्रतिसाद देत सहकार्याची भूमिका व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अश्विन पोछी होते. प्रमुख अतिथी म्हणुन ज्येष्ठ शिक्षिका मीना मानकर, मेघा बढे, सविता ठाकरे उपस्थित होत्या. सोनुले ताई, रामटेके आणि इस्राईल पठाण यांचीही प्रमुख उपस्थिती पालकवर्गातून लाभली. या सभेमध्ये प्रमुख अतिथींमध्ये असलेल्या मेघा बडे आणि सविता ठाकरे यांनी अतिशय उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले.

सभेमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, नियमित उपस्थिती, शिस्त, अभ्यासातील सातत्य, स्पर्धा परीक्षा, सहशालेय उपक्रम, डिजिटल शिक्षण, पालकांची जबाबदारी तसेच शाळा-पालक यांच्यातील सुसंवाद या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पालकांनी विविध सूचना व मते मांडत शाळेच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शाळेस-ोबत खांद्याला खांदा लावुन कार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक अश्विन पोछी यांनी पालकांच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार नंदिनी ठाकरे यांनी मानले. या कार्यक्रमाला पालकांचा अभूतपूर्व प्रतिसाद, सकारात्मक चर्चा आणि विधायक सूचनांमुळे ही माता, पालक, शिक्षक सभा अत्यंत यशस्वी व प्रेरणादायी ठरली.

# मुंबईसाठी रेड अलर्ट! ताशी ९० किमी वेगाने वादळी वारे : अतिवृष्टीचा इशारा, १५ हजार कर्मचारी तैनात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशासाठी भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) पावसाचा इशारा ऑरेंज अलर्टवरून रेड अलर्टमध्ये श्रेणीवाढ केली आहे. शहरात पुढील काही तासांत अतिमुसळधार पाऊस आणि ताशी ८० ते ९० किमी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेने (बीएमसी) नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन केले आहे. मुंबईसाठी रेड अलर्ट रविवारी वाढत्या पावसाच्या पार्श्वभूमीवर आयएमडीने मुंबईतील पावसाचा इशारा ऑरेंजवरून रेड अलर्टमध्ये बदलला. पुढील काही तास शहरात अतिमुसळधार पावसासह जोरदार वाऱ्यांचा तडाखा बसण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. बीएमसीचे नागरिकांना आवाहन बीएमसीने जारी केलेल्या निवेदनात नागरिकांना मुसळधार पावसाच्या काळात घरातच सुरक्षित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडू नये, तसेच झाडे, जीर्ण इमारती, होर्डिंग्ज, वीज खांब, पाणी साचलेले भाग आणि इतर धोकादायक ठिकाणांपासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-३२०/२५-२६ दि.२९/०६/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **शेख ताहील शेख अब्बास, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे- शेख ताहील शेख अब्बास, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१५/०६/१९८९** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यूचे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **२९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५१२/२०२६ ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) वसंत बाळकृष्ण टाकरखेडे, वय अं.७३ वर्ष, धंदा-शेती, २) दिपक बाळकृष्ण टाकरखेडे, वय अं.६१ वर्ष, धंदा- शेती, ३) ललिता गणेशराव खाजबागे, वय अं.८० वर्ष, धंदा- घरकाम, ४) कुसुम वसंतराव येवले, वय अं.६८ वर्ष, धंदा- घरकाम, ५) आशा अरविंद मेहेत्रे, वय अं.६५ वर्ष, धंदा- घरकाम, ६) रेखा संजय अंबाडकर, वय अं.५७ वर्ष, धंदा- घरकाम, अर्जदार क्र.१ व २ रा.शेंदुरजनाघाट, अर्जदार क्र.३ रा.डवरगाव, अर्जदार क्र.४ रा.पारडसिंगा, ता.काटोल, जि.नागपुर, अर्जदार क्र.५ रा.सालोड, ता.जि.वर्धा, अर्जदार क्र.६ रा.अमरावती.

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत बाळकृष्णराव तुकारामजी टाकरखेडे व शेवंता बाळकृष्ण टाकरखेडे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख २५/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५१५/२०२६ ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) अनिता दिवाकर दवंडे, वय अं.५६ वर्ष, धंदा-घरकाम
२) रुपेश दिवाकर दवंडे, वय अं.३७ वर्ष, धंदा- शेती
३) पंकज दिवाकर दवंडे, वय अं.३५ वर्ष, धंदा- शेती
४) कविता सुरेशराव जाऊरकर, वय अं.३९ वर्ष,धंदा- घरकाम

अर्जदार क्र. १ व ३ रा.शेंदुरजनाघाट, अर्जदार क्र.२ रा.नागपुर, ता.जि.नागपुर, अर्जदार क्र.४ रा.बेनोडा शहीद

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत दिवाकर परसराम दवंडे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख २५/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५१८/२०२६ ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) प्रमिला रमेशराव मोरे, वय अं.५७ वर्ष, धंदा- घरकाम, २) निकेश रमेशरावजी मोरे, वय अं.३० वर्ष, धंदा- शेती, ३) रंजना नितीन सुरजुसे, वय अं.३७ वर्ष, धंदा- घरकाम, ४) साधना राहुल बावणे, वय अं.३५ वर्ष, धंदा- घरकाम, ५) अर्चना नितीन सोनोने, वय अं.३३ वर्ष, धंदा- घरकाम, अर्जदार क्र.१, २ व ५ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, अर्जदार क्र.३ रा.पांढुर्णा, ता.जि.पांढुर्णा, अर्जदार क्र.४ रा.सौंसर, ता.सौंसर, जि.छिंदवाडा

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत रमेश डोमाजी मोरे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २५/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवेसह जुना महामार्ग पूर्णपणे बंद : धबधब्यांवर जाणं टाळा, अन्यथा : मंत्री गिरीश महाजन यांचा कडक इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या आणि अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी नागरिकांना अत्यंत महत्त्वाचा इशारा दिला आहे. सध्याची परिस्थिती पाहता, नागरिकांनी कोणत्याही अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. सतत कोसळणारा पाऊस आणि काही ठिकाणी घडलेल्या दरड कोसळण्याच्या दुर्घटनांमुळे वाहतुकीवर प्रचंड मोठा परिणाम झाला आहे. प्रवाशांच्या सुरक्षेचा विचार करून प्रशासन आणि सरकारने मोठा निर्णय घेतला असून, पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग तसेच जुना मुंबई-पुणे महामार्ग या दोन्ही प्रमुख मार्गांवरील वाहतूक दोन्ही दिशांनी पुढील आदेश येईपर्यंत पूर्णपणे थांबवण्यात आली आहे.

या मार्गावरून प्रवास न करण्याचे कडक निर्देश देण्यात आले आहेत. मुंबई-पुणे एक्सप्रेस वे आणि जुना महामार्ग बंद मुंबई आणि आसपासच्या परिसरातील बिघडत चाललेल्या हवामानावर बोलताना मंत्री महाजन यांनी पर्यटकांना सक्त ताकीद दिली आहे. मुंबईत सध्या ७० ते ९० किलोमीटर प्रतितास या वेगाने वादळी वारे वाहत असून ठिकठिकाणी झाडे कोलमडण्याच्या घटना घडत आहेत. अशा धोकादायक परिस्थितीत मुंबईत पर्यटनासाठी गर्दी करू नये, तसेच धबधब्यांच्या ठिकाणी हुल्लडबाजी करून स्वतःचा जीव धोक्यात घालू नये, असा इशारा त्यांनी दिला आहे. प्रशासनाच्या नियमांचे पालन न केल्यास सरकारला सक्तीची पावले उचलावी लागतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या संकटसमयी मानखुर्द येथे ६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती देत, विरोधकांनी या संवेदनशील परिस्थितीवर राजकारण न करता जनतेला धीर द्यावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५२१/२०२६ ने.ता.३१/०७/२०२६**

**अर्जदार :-**

शिवरात्री संदीप उईके
वय अं. २४ वर्षे, धंदा-घरकाम
रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि. अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत सायना साजी धुर्वे व साजीलाल अमबेल धुर्वे, रा.शेंदुरजनाघाट** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.३१/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख २५/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५४५/२०२६ ने.ता.२४/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) दिपक पंढरीनाथ रेवतकर, वय अं.४८ वर्ष, धंदा-शेती, २) ज्योती राजेंद्र सांबारे, वय अं.४२ वर्ष, धंदा- घरकाम, अर्जदार क्र.१ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, अर्जदार क्र.२ रा.मारुड, ता.जि.पांढुर्णा

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत पंढरीनाथ महादेवराव रेवतरकर व चंद्रभागाबाई पंढरीनाथजी रेवतकर, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २५/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५४६/२०२६ ने.ता.०१/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) गणेश बाबुराव दामेधर, वय अं.४६ वर्ष, धंदा-शेती
२) किरणकुमार बाबुराव दामेधर, वय अं.४४ वर्ष, धंदा- शेती
३) ममता विजयराव पोकळे, वय अं.४२ वर्ष, धंदा- घरकाम

अर्जदार क्र. १ ते २ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती
अर्जदार क्र. ३ रा.आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत बाबुराव झिंगराजी दामेधर व सिंधु बाबुराव दामेधर, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २५/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५२२/२०२६ ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) कांचन दिलीपराव राऊत, वय अं.४२ वर्ष, धंदा-घरकाम
२) श्रेयश दिलीपराव राऊत, वय अं.२० वर्ष, धंदा- शिक्षण
३) निहाल दिलीपराव राऊत, वय अं.१९ वर्ष, धंदा- शिक्षण

अर्जदार क्र. १ ते ३ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
ह.मु.रा.खारगड, पो.थडीपवनी, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत दिलीप पंजाबराव राऊत, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २५/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### नगरपरिषदेसोबत आर्थिक हितसंबंध सिद्ध : सदस्यपद तत्काळ रद्द, जागा रिक्त घोषित

# नगरसेवक आशिष अढाऊ अपात्र : जिल्हाधिकाऱ्यांचा ऐतिहासिक निर्णय

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – शेंदुरजनाघाट नगरपरिषदेचे प्रभाग क्रमांक ६ (अ) चे नगरसेवक आशिष बाबाराव अढाऊ यांना महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १६(१)(आय) सह कलम ४४ अंतर्गत अपात्र ठरवत त्यांचे नगरसेवकपद रद्द करण्याचा अंतिम आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिष येरेकर (भा.प्र.से.) यांनी ३ जुलै २०२६ रोजी पारित केला आहे.

आदेशानुसार हा निर्णय तत्काळ प्रभावाने लागू झाला असून संबंधित नगरसेवकाचे पद रिक्त घोषित करण्यात आले आहे. या प्रकरणात



शेंदुरजनाघाट येथील गौरव सुनील गणोरकर यांनी २३ मार्च २०२६ रोजी अपात्रतेचा अर्ज दाखल केला होता. या अर्जात नगरसेवक आशिष अढाऊ यांचे नगरपरिषदेसोबत व्यावसायिक व आर्थिक हितसंबंध असल्याचा आरोप करण्यात आला होता. नगरपरिषदेच्या विविध कामांच्या निविदांमध्ये सहभाग, कंत्राटे, देयके आणि नगरपरिषदेकडून मिळणाऱ्या रकमेच्या आधारे ते कायद्यातील अपात्रतेच्या कक्षेत येत

> जिल्हाधिकाऱ्यांनी प्रारित केलेला आदेश हा मला मान्य नसुन मी याविरूद्ध न्यायालयात दाद मागणार आहे. प्रभागातील जनतेनी माझावर विश्वास ठेवून मला निवडुन दिले. त्यामुळे मी सत्याच्या आधारे पुन्हा न्यायालयात धाव घेत न्याय मागणार आहे. मला खात्री आहे की, न्यायालयात मला अपेक्षित न्याय मिळेल अशी प्रतिक्रिया न.प.सदस्य आशिष अढाऊ यांनी व्यक्त केली.

असल्याचा दावा अर्जात करण्यात आला होता. या प्रकरणावर अनेक टप्प्यांत सुनावणी घेण्यात आली. तक्रारदाराच्या वतीने ॲड.निलेश गावंडे यांनी सविस्तर युक्तिवाद करत सर्वोच्च व उच्च न्यायालयातील निर्णयांसह विविध कायदेशीर तरतुदींचा आधार घेतला. तर दुसऱ्या बाजूने नगरसेवक आशिष अढाऊ यांच्या वतीनेही आपली बाजू मांडण्यात आली.

सर्व उपलब्ध कागदपत्रे, पुरावे, करारनामे, नगरपरिषदेचे अभिलेख आणि दोन्ही पक्षांचा युक्तिवाद विचारात घेतल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी आशिष अढाऊ यांचे नगरपरिषदेसोबत आर्थिक व व्यावसायिक हितसंबंध असल्याचे स्पष्टपणे नमूद केले. त्यामुळे ते नगरसेवकपदासाठी अपात्र ठरत असल्याचा निष्कर्ष आदेशात नोंदविण्यात आला. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी यांचे सदस्यपद तत्काळ प्रभावाने रद्द करून संबंधित जागा रिक्त घोषित केली आहे तसेच या आदेशाची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना देऊन आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याचे निर्देशही दिले आहेत.

या निर्णयामुळे शेंदुरजनाघाटच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधींच्या हितसंबंधांबाबत कायद्याची कठोर अंमलबजावणी झाल्याचे मानले जात आहे. आगामी काळात या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात आव्हान दिले जाणार काय? याकडेही राजकीय व कायदेविषयक वतुर्ळाचे लक्ष लागले आहे.

## राम मंदिर देणगी घोटाळा : अटक केलेल्यांमध्ये प्राथमिक शिक्षक, मेकॅनिक, निवृत्त बँक कर्मचारी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**अयोध्या** – अयोध्येतील राम मंदिरातील दानपेटीतील अफरातफरीच्या प्रकरणात पोलिसांनी आठ जणांना अटक केली आहे. यामध्ये एका प्राथमिक शाळेचा शिक्षक, माजी कार मेकॅनिक, सेवानिवृत्त बँक कर्मचारी आणि श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याचा विश्वासू सहकारी यांचा समावेश आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हे आरोपी प्रामुख्याने एका आऊटसोर्सिंग एजन्सीद्वारे कंत्राटी कामगार म्हणून कामावर ठेवण्यात आले होते. त्यांनी मंदिराच्या देणगी व्यवस्थापन प्रणालीतील आपल्या पदाचा फायदा घेऊन



काळांतराने रोख रकमा हडपल्याचा आरोप आहे. तपास पथक आता त्यांच्या आर्थिक व्यवहारांची, मालमत्तेची आणि या कथित कटातील त्यांच्या वैयक्तिक भूमिकेची तपासणी करत आहे.

आरोपींची पार्श्वभूमी आणि आरोप यातील अविनाश शुक्ला हा प्राथमिक शिक्षक होता. देणगी मोजणी दरम्यान रोख रकमेच्या मेळ घालण्याचे काम त्याच्याकडे होते. त्याची घरे इत्यादी ठिकाणी

२० वीस हजार कोटींची लूट : खर्गे यांचा आरोप

चिक्कबल्लापूर : काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी रविवारी अयोध्येतील राम मंदिराच्या नावावर जमा झालेल्या देणग्यांमध्ये २०,००० कोटी रुपयांची 'लूट' झाल्याचा आरोप केला असून, त्यासाठी भाजप आणि आरएसएसला जबाबदार धरले आहे. खर्गे म्हणाले, 'देवाच्या नावावर किती लूट होत आहे, हे तुम्ही पाहिलेच आहे.

# एक पाऊस पडलाय अनब महाराष्ट्र पूर्णपणे पॅरालिसिसि झाल्याचे चित्र, सुप्रिया सुळेंचा सरकारावर हल्लाबोल

### तातडीने आढावा घेऊन आणीबाणी जाहीर करण्याचीही मागणी

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – खरं तर मला विश्वासच बसत नाही कि ज्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचा इतका गांजावाजा करत कार्यक्रम झाला, ज्यामुळे अर्धा तास सगळ्यांचा वाचत होता, त्यामुळे सगळ्यांनीच त्याचे कौतुक केलं. सध्या कॉस्टमध्ये पडायला नको कारण तो वेगळा विषय आहे. मात्र ज्या पद्धतीने मिसिंग लिंकचे व्हिडीओ येतोय हे अतिशय चिंताजनक आहे. राज्यात या पूर्वीही पाऊस झाला आहे. मुंबई–पुण्याला



पाऊस नवा नाही. पण असं चित्र पूर्वी नव्हतं. हे कदाचित पहिल्यांदाच पाहायला मिळत असून हे अतिशय चिंताजनक असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी तातडीने आढावा घेऊन राज्यात आणीबाणी जाहीर करावी. महाराष्ट्राचे नेमकं चित्र काय? यावर देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य करणं अतिशय आवश्यक असल्याचेही त्या म्हणाल्या. राज्यात एक पाऊस पडलाय आणि महाराष्ट्र पूर्णपणे पॅरालिसिसि झाल्याचे चित्र सर्व माध्यमांमधून दिसत आहे.

### वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी राज्यस्तरीय पुरस्काराने

# प्रगतिशील शेतकरी रामभाऊ महादेवराव ढोरे सन्मानित

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने आयोजित अत्यंत दिमाखदार सोहळयात वरुड येथील प्रगतिशील संत्रा उत्पादक शेतकरी रामभाऊ महादेवराव ढोरे यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा सोहळा अत्यंत भव्य देखणा, शिस्तबद्ध आणि नियोजन पद्धतीने मुंबईच्या सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे पार पडला. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,



**सन्मान पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी**

> कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा एवढ्या मोठ्या प्रमाणात गौरव करून कृषी विभागाने बळ दिले आहे. या उत्कृष्ट आणि शिस्तबद्ध नियोजनाबद्दल मी आणि माझ्या कुटुंब संपूर्ण महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचा ऋणी आहे. हा सन्मान आमच्यासाठी अभिमानाचा असून तो मी माझ्या कष्टकरी शेतकऱ्यांना तो अर्पण करतो तसेच माझ्या पुढील आयुष्याकरीता तो प्रेरणा देणारा ठरेल, असे मत रामभाऊ ढोरे यांनी व्यक्त केले.

सुनेत्रा पवार, महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरतसेठ गोगावले, कृषि राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, इंद्रनील नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

त्या सोहळ्यात पुरस्कार विजेत्यांचे अत्यंत आत्मीयतेने आदर आणि सन्मानाने स्वागत करण्यात आले. विमानतळापासून ते हॉटेल आणि कार्यक्रम स्थळापर्यंत कृषी विभागाच्या वतीने उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती.

दर्जेदार निवास, भोजन आणि फराळाच्या व्यवस्थेसोबतच सर्व पुरस्कारर्थींना देण्यात आलेला आकर्षक भेटवस्तूंनी या सोहळ्याची भव्यता अधिकच वाढवली. कृषी क्षेत्रातील कष्टकऱ्यांचा अशा प्रकारे राजेशाही थाटात गौरव केल्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

रामभाऊ ढोरे यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल वरुड परिसरातील शेतकरी बंधु, व्यावसायिक आणि इतर हितचिंतकांकडून त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या पुरस्कारामुळे वरुडचा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## रायगड जिल्ह्यात हाहाकार! मुंबई-गोवा महामार्ग ८ तास ठप्प : अंबा, कुंडलिका, पाताळगंगाने ओलांडली धोका पातळी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – राज्यभरात गेल्या २४ तासांपासून पावसाने रौद्ररूप धारण केले असून अनेक भागांत पावसाचे जोरदार धुमशान सुरू आहे. परिणामी रायगडमधील अंबा, कुंडलिका आणि पाताळगंगा नद्यांनी धोका पातळी ओलांडली आहे, तर रायगडच्या उत्तर भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दुसरीकडे पेण, नागोठणे, पाली, रोहा परिसरात देखील पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान, पुढील काही तासांत पावसाचा जोर



वाढण्याची शक्यता असून नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहण्याच्या प्रशासनाकडून सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र जोरदार पाऊस आणि नद्यांना आलेल्या पुरामुळे रायगड जिल्ह्यातील जनजिवन विस्कळीत झाल्याचे चित्र आहे.

'एसटी'मध्ये अडकलेल्यांची सुटका

रायगडच्या रसायनी येथे एसटी बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. ही बस पुराच्या पाण्यात अडकली होती. शिवाय या बसमध्ये एकूण आठ प्रवासी अडकून पडले होते. कर्जत–पेण मार्गावरील सारसई येथील ही घटना असून पाताळगंगा नदीला आलेल्या पुराच्या पाण्यात बस अचानक आडकली होती.




